# रेशनच्या काळ्या बाजारावर अंकुश ठेवणारी दक्षता समिती गेली कुठे?

**मुंबई, दि. १८ : प्रतिनिधी**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरण करण्यात येणाऱ्या वस्तूंवर देखरेख ठेवण्यासाठी विविध स्तरांवर दक्षता समित्या गठित करण्याचा शासन निर्णय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने घेतला होता. ७ मार्च २०२२ रोजी मुंबई महापालिकेच्या नगरसेवकांचा कार्यकाळ संपला आहे. मात्र अद्याप पालिकेची निवडणूकच झाली नसल्याने ही समिती पूर्णक्षमतेने कार्यरत नाही ही, वस्तुस्थिती आहे. मुंबई शहर आणि उपनगरातील रेशन दुकानांवर अंकुश ठेवणाऱ्या दक्षता समितीची निवडच झालेली नाही. राज्यात नवे सरकार नुकतेच स्थापन झाले आहे. मात्र अजून मंत्र्यांची खाती व त्यानंतर पालकमंत्री घोषित होणार आहे. त्यानंतरच पालकमंत्री हे नव्या दक्षता समितीची स्थापना करतील. नवे सरकार नुकतेच स्थापन झाले आहे. मंत्र्यांची खाती व त्यानंतर पालकमंत्री घोषित होणार आहे. त्यानंतर पालकमंत्री हे नव्या दक्षता समितीची स्थापना करतील, अशी अपेक्षा आहे, अशी माहिती एका वरिष्ठ शिधावाटप अधिकाऱ्याने दिली.

**कशी होते कार्यवाही?**

रेशन लाभार्थीला रेशन दुकानांवर धान्य मिळत नसल्यास, मिळणाऱ्या धान्यांपेक्षा कमी मिळत असल्यास, संबंधित रेशन दुकानावर काळाबाजार झाल्याची बाब पुरवठा यंत्रणेच्या निदर्शनास लाभार्थी आणतात किंवा दक्षता समितीच्या निदर्शनास आणल्यास त्या प्रकरणांची चौकशी केली जाते. त्यानंतर दोषींवर कारवाईचा बडगा उगारला जातो.

**मुंबईच्या दक्षता समितीची रचना कशी असते?**

» शिधावाटप क्षेत्रातील विधानसभा सदस्य अध्यक्ष.

» उर्वरित विधानसभा सदस्य किंवा विधान परिषद. सदस्य किंवा त्यांनी सुचविलेले सामाजिक कार्यकर्ते- उपाध्यक्ष.

» तीन महिला सदस्य- सदस्य.

» विरोधी पक्षाचे दोन सदस्य (त्यापैकी एक महिला असावी).

» शिधावाटप कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील पाच नगरसेवक किंवा त्यांनी सुचविलेले सामाजिक कार्यकर्ते-सदस्य.

» नियंत्रण शिधावाटप, मुंबई किवा जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या रास्तभाव धान्य / शिधावाटप दुकानदारांचा एक प्रतिनिधी-सदस्य.

» इतर दोन व्यक्तींपैकी एक ग्राहक चळवळीशी संबंधित असावा, तसेच यापैकी एक प्रतिनिधी-सदस्य.

» मुंबई शिधावाटप क्षेत्रासाठी संघटित संस्थांचा प्रतिनिधी-सदस्य.

» अनुसूचित जातीचा एक प्रतिनिधी-सदस्य.

» अनुसूचित जमातीचा एक प्रतिनिधी-सदस्य.

» अन्नधान्य वितरण अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेले अधिकारी / मुंबई शिधावाटप क्षेत्रासाठी शिधावाटप अधिकारी-सदस्य सचिव.

# 'हिरकणी' रुग्णालयाचा आराखडा अंतिम टप्प्यात

## पनवेल महापालिकेचे दोन एकर जागेवर आठ मजली रुग्णालय

**पनवेल, दि. १८ : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका प्रशासनाने पालिका क्षेत्रातील महिला आणि बालकांच्या आरोग्याचा विचार करता सर्वाधिक खर्चाची तरतूद पालिकेच्या पहिल्या माता बाल संगोपण रुग्णालयासाठी केली आहे. दोन एकर जागेवर हे आठ मजली 'हिरकणी' रुग्णालय बांधण्यासाठी तब्बल पाचशे कोटी रुपयांपेक्षा अधिकचा खर्च केला जाणार आहे. पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी नुकत्याच एका बैठकीत शहर अभियंतांना या रुग्णालय इमारतीच्या आराखड्याबद्दल काही निवडक बदल सुचवले आहेत. अंतिम बदलानंतर पालिकेच्या लवकरच होणाऱ्या प्रशासकीय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतर बांधकामाची निविदा प्रक्रिया पालिका राबविणार असल्याचे पालिकेच्या विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

पनवेल महापालिका कळंबोली सर्कलवरुन जेएनपीटीकडे जाणाऱ्या मार्गावर नौपाडा गावाच्या विरुद्ध दिशेला ७,५३९ चौरस मीटर सिडकोकडून मिळालेल्या भूखंडावर हे रुग्णालय उभारले जात आहे. ४५० रुग्णखाटांसाठी तळमजल्यावर ८ मजली इमारतीमधील ३ लाख ४१ हजार चौरस फुटाचा वापर रुग्णालयासाठी केला जाईल. पालिकेच्या माजी नगरसेवकांनी या रुग्णालयाला 'हिरकणी' या नावाचा ठराव मंजूर केला आहे. १२० वाहने रुग्णालयात उभी राहतील एवढ्या क्षमतेचे हे रुग्णालय असणार आहे. पालिका क्षेत्रात सध्या पालिकेचे २६ वैद्यकीय दवाखाने सुरू आहेत. मात्र गर्भवती महिलांना सार्वजनिक आरोग्य विभागाने पनवेल शहरामधील नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय तसेच कळंबोली येथे धर्मादाय तत्वांवर चालविले जाणाऱ्या एमजीएम रुग्णालयावर अवलंबून रहावे लागते.

पालिका क्षेत्रात वर्षाला १३००० हजारांहून अधिक बालकांचा जन्म होतो. पनवेल तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील महिलांना सुद्धा या रुग्णालयाचा लाभ होईल. सध्या प्रसुतीनंतर अतिदक्षता विभाग माता व बालकांसाठी पालिकेची हक्काची कोणतीही सोय नसल्याने पालिकेला असे रुग्ण नवी मुंबई महापालिकेच्या रुग्णालयात पाठवावे लागतात. तेथेही खाटा उपलब्ध नसल्यास हे रुग्ण मुंबईकडील सरकारी वैद्यकीय सेवेकडे धावू लागतात. पालिकेचे तत्कालिन आयुक्त गणेश देशमुख यांच्या कारकिर्दीत या रुग्णालयाची गरज असल्याचा प्रस्ताव सभागृहात मांडण्यात आला. त्यानंतर या रुग्णालयासाठी लागणाऱ्या प्रस्ताव आणि खर्चासह रुग्णालयाच्या नावाला 'हिरकणी'ला माजी नगरसेवकांनी सभागृहात मंजूरी दिली होती.

रुग्णालयासाठी लागणारा भूखंडाचे हस्तांतरण सिडको मंडळाकडून झाल्यानंतर विद्यमान आयुक्त मंगेश चितळे यांनी या रुग्णालयासाठी मॅरथॉन बैठकीचे सत्र सुरू केले. वेळोवेळी रुग्णालय इमारतीच्या आराखड्यात बदल सूचविल्यानंतर आयुक्त चितळे यांनी दोन टप्यात या रुग्णालयाचे बांधकाम पुर्ण करण्याचे नियोजन आखण्याच्या सूचना पालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर यांना दिल्या. त्यामुळे पुर्ण इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर पहिल्या टप्यात अडीचशे रुग्णखाटांचे रुग्णालय पालिका सुरू करण्यासाठी नियोजन करत आहे. ४५० रुग्ण खाटांचे हे रुग्णालय चालविण्यासाठी वैद्यकीय अधिक्षकापासून वैद्यकीय अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, पारिचारीका, वार्डबॉय, सूरक्षा रक्षक आणि इतर ३०० हून अधिक आरोग्यसेवक या रुग्णालयासाठी लागणार आहेत.

**'स्वराज्य'साठी १५० कोटी तर 'हिरकणी'साठी ५०० कोटी**

पालिकेचे नवीन प्रशासकीय भवन म्हणजे 'स्वराज्य' या इमारतीच्या बांधकामासाठी दीडशे कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च पालिका करत आहे. या भवनापेक्षा तीन पटीने तब्बल पाचशे कोटी रुपये खर्च पालिका माता बाल संगोपण रुग्णालयासाठी करणार आहे. या रुग्णालयामुळे पनवेलमधील गर्भवती महिला आणि बालकांना मोठा लाभ होईल.

# महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

**नागपूर, दि. १८ : प्रतिनिधी**

राज्यातील गोवंशाचे संवर्धन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या www.mahagosevaayog.org या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले. विधानभवनातील समिती सभागृहात या संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. राज्यामध्ये देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी, गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यात 1 कोटी 39 लाख गोवंश असून त्यामध्ये 13 लाख देशी गायी असल्याची माहिती अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली. 'गो टेन' अंतर्गत गो संगोपन, गो संवर्धन, गो संरक्षण, गोमय मूल्यवर्धन, गोशाळा, गोरक्षक, गोपालक, गो आधारीत शेती, गो साक्षरता आणि गो पर्यटन या माध्यमातून गायींच्या संवर्धनाचे काम करण्यात येत आहे. राज्यात देशी गायींसाठी विशेष दुग्धशाळा (डेअरी) निर्माण करण्यात येतील, असेही श्री. मुंदडा यांनी सांगितले.

आयोगामार्फत देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करणे व त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण केले जात आहे. गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोवंश संस्थांची नोंदणी, गोवर्धन गोवंश सेवा केन्द्र योजना व इतर योजना अंतर्भुत करणे व त्याची अंमलबजावणी करणे, पशुआरोग्य सेवांचे प्रचालन करणे, दुर्बल, वयस्क व रोगग्रस्त पशुंचे व्यवस्थापन, काळजी व उपचार यांची सुनिश्चिती, पशुंची काळजी घेणाऱ्या व्यक्तींचे प्रशिक्षण आणि जनजागृती केली जात असून त्याबाबतची माहिती संकेतस्थळाच्या माध्यमातून सार्वजनिक करण्यात आली आहे. सर्वसामान्य जनता आणि गोवंश संवर्धन करणाऱ्या संस्थांसाठी या संकेतस्थळाच्या माध्यमातून एका क्लिकवर माहिती उपलब्ध करून दिली आहे.

संकेतस्थळाच्या अनावरण प्रसंगी मुख्य सचिव सुजाता सौनिक, गोसेवा आयोगाचे सदस्य सर्वश्री संजय भोसले, डॉ. नितीन मार्कंडेय, उद्धव नेरकर, सुनील सूर्यवंशी, सनत कुमार गुप्ता, दीपक भगत आदी उपस्थित होते.

# 3 दिवसांत हात साफ करा, ऑटोमॅटिक बस रस्त्यावर चालवा!

## बेस्टकडे ड्रायव्हरसाठी कसले नियमच नाहीत

**मुंबई, दि. १८ : प्रतिनिधी**

कुर्ला बेस्ट बस अपघाताच्या प्राथमिक चौकशी अहवालात बसमध्ये कोणताही दोष नसल्याचे निष्पन्न झाले असले तरी याबाबत एक धक्कादायक बाब समोर आली आहे. बेस्टने फक्त मॅन्युअल गीअर असलेल्या बस चालविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे (एसओपी) बनवली असून अद्याप नवीन ऑटोमॅटिक इलेक्ट्रिक बस चालविण्यासाठी अशी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे तयार केलेली नाहीत. कंत्राटी बस ड्रायव्हरना ऑटोमॅटिक इलेक्ट्रिक गाड्या चालविण्याचे योग्य प्रशिक्षणच मिळाले नसल्याचे उघड झाले आहे. बेस्ट ड्रायव्हरचे प्रशिक्षण आणि सुरक्षेच्या निकषांवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

बेस्टमधील सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार बेस्टच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कायमस्वरूपी सेवेत येणाऱ्या बस ड्रायव्हरना सुरुवातीला ४ आठवड्यांचे प्रशिक्षण दिले जाते, तसेच त्यांचे मूल्यमापनही करण्यात येते; परंतु कंत्राटी पद्धतीने घेण्यात येणाऱ्या ड्रायव्हरसाठी मात्र अशी प्रशिक्षण प्रक्रिया राबवण्यात येत नाही.

**कंत्राटी ड्रायव्हरची मनमानी कधी संपणार?**

मुळात राज्य परिवहन विभागाचे याबाबत अद्याप कोणतेही स्पष्ट धोरण नसल्याचे उघड झाले आहे. २ वाढत्या ऑटोमॅटिक इलेक्ट्रिक गाड्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन राज्यभरातील सर्वच संस्थांसाठी मॅन्युअलबरोबर ऑटोमेंटिक गाडी चालविण्याची मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे आवश्यक आहे. मात्र, ती प्रक्रिया अजूनही झालेली नसल्याचे वाहतूक तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यातही प्रशिक्षण कार्यशाळेसाठी अनेक कंत्राटी चालक हजरच राहत नसल्याचे बेस्टच्या निवृत्त प्रशिक्षकांनी सांगितले. त्यामुळे कंत्राटी ड्रायव्हरच्या या मनमानीवर बेस्टचा वचक आहे का, अशी शंका उपस्थित होत आहे.

बेस्टकडे कायमस्वरूपी तत्त्वावर भरती केलेले ११ हजारांपेक्षा अधिक ड्रायव्हर असणे आवश्यक आहे. सध्या त्यांची संख्यादेखील निम्म्यापेक्षा कमी झाली आहे. बेस्टमध्ये गेली कित्येक वर्षे ड्रायव्हर आणि कंडक्टरची भरती झाली नसल्याने येत्या काळात बेस्ट या सार्वजनिक उपक्रमाचे रूपांतर खासगी उपक्रमामध्ये होण्यास वेळ लागणार नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

## आता रामदास आठवले राजीनामा देणार का?-उद्धव ठाकरे

**मुंबई, दि. १८ : प्रतिनिधी**

मागील अडीच तीन वर्षांपासून आपण सतत पाहत आहोत की, भाजप नेत्यांकडून महापुरुषांचा अपमान करण्याचा निंदनीय प्रकार सुरू आहे. आता हा अपमान सहनशीलतेच्या पुढे गेला आहे. आता तर देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी कहरच केला. त्यांनी अतिशय उर्मटपणाने आता आंबेडकर आंबेडकर फॅशन झाली आहे. त्यापेक्षा देवाचे नाव घेतले असते, तर पुण्य लाभले असते, असे विधान केले आहे. आता यावर भाजपचा घटक पक्ष असलेले नितीशकुमार, चंद्राबाबू नायडू कोणती भूमिका घेणार? केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले राजीनामा देणार का? असा सवाल करून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी निशाणा साधला.

ते पुढे म्हणाले की, महात्मा जोतिबा फुले आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान तत्कालीन राज्यपाल कोश्यारी यांनी केला.

ANAND RATHI

**आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड**

एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई - ४०००६३ भारत
मोबाईल: +91-8451942710 वेबसाइट:www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे https://sarfaesi.auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: (१) एम/एस मधुसन एक्सपोर्ट्स, (कर्जदार) ४०२ श्रीकांत चेंबर्स, व्हीएन पुरव मार्ग, चेंबूर पूर्व, मुंबई: ४०००७१

सह-कर्जदाराचे नाव: (२) श्री. सोनी राधे मोहन अग्रवाल (सह-कर्जदार) ४०१, अल्पाइन अपार्टमेंट, डॉ. सी. जी. रोड, चेंबूर, शालीमार पेट्रोल पंप समोर, मुंबई: ४०००७४ (३) श्रीमती तारू सोनी अग्रवाल (सह-कर्जदार) ४०१, अल्पाइन अपार्टमेंट, डॉ. सी जी रोड, चेंबूर, शालिमार पेट्रोल पंप समोर, मुंबई: ४०००७४.

वेळापत्रक

मालमत्तेचा पत्ता:- फ्लॅट क्रमांक ४०१, चौथा मजला, अल्पाइन अपार्टमेंट सीएचएसएल, सीजी रोड, कोटक महिंद्रा बँक जवळ, चेंबूर, मुंबई, ४०००७४.

| | |
|---|---|
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु. १,७३,८९,५७१/- (रुपये एक कोटी त्रेहात्तेर लाख एकोणनव्वद हजार पाचशे एकहत्तर फक्त) |
| लिलावाची तारीख | ३ जानेवारी २०२५ |
| राखीव किंमत | रु. २,०३,५५,१३८/- (रुपये दोन कोटी तीन लाख पंचावन्न हजार एकशे अडतीस फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किंमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. १०,०००/- |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | २७ डिसेंबर २०२४ सकाळी १० ते दुपारी ४ वा |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | ३० डिसेंबर २०२४ केवायसी कागदपत्रांसह संध्याकाळी ४.०० पर्यंत |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ३ जानेवारी २०२५ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात.

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली १५ दिवसांची नोटीस देखील आहे.

तारीख: १८ डिसेंबर २०२४
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता

# ड्युटीवर डुलक्या काढणे हे गैरवर्तन; हायकोर्टाचा निर्वाळा

**मुंबई, दि. १८ : प्रतिनिधी**

ड्युटीवर अधूनमधून डुलक्या काढत झोपणे हे गैरवर्तन असल्याचा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला. न्यायमूर्ती संदीप मारणे यांनी हा निर्वाळा देताना ड्युटीवर झोप घेतल्याने कामावरून काढलेल्या कामगाराला थकीत देयकांसह पुन्हा कामावर घेण्याचा कामगार न्यायालयाचा आदेश रद्द केला.

वाकेड येथील असाही कंपनीच्या प्लांटवर वॉचमन म्हणून कार्यरत असलेल्या नदीम डोलारे २७ ऑक्टोबर २००६ रोजी नाईट शिफ्टफदरम्यान तो चेंजिंग रूममध्ये झोपल्याचे आढळून आले. कंपनीने याची गंभीर दखल घेत शिस्तभंगाची कारवाई करून ३१ ऑगस्ट २००७ रोजी डोलारेला कामावरून बडतर्फ केले. त्या विरोधात आव्हान दिले. त्यावर कामगार न्यायालयाने शिस्तभंगाची कारवाई व संबंधित चौकशीतील निष्कर्ष अयोग्य ठरवले होते कामगार न्यायालयाच्या आदेशा विरोधात कंपनीने उच्च न्यायालयात अपील दाखल केले. त्यावर न्यायमूर्ती संदीन मारणे यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने कर्तव्य बजावताना झोप काढणे गैरवर्तनच आहे. तथापि, या एका कारणावरून कर्मचाऱ्याला बडतर्फ करणे चुकीचे आहे. झोपाळू कर्मचाऱ्याला शिक्षा देताना त्या कर्मचाऱ्याच्या सेवेचा मागील रेकॉर्ड विचारात घेणे आवश्यक आहे. त्याच्यावरील आरोपाला पुष्टी देणारे काही पुरावे असतील, तर कामगार आणि औद्योगिक न्यायालय संबंधित कंपनीने केलेल्या अंतर्गत चौकशीतील निष्कर्ष रद्द करू शकत नाही, असे निरीक्षण नोंदविले. तसेच झोपाळू कामगाराला पुन्हा कामावर घेण्याचा तसेच थकीत वेतन देण्याचा कामगार न्यायालयाचा आदेश रद्द करून त्याबदल्यात संबंधित कामगाराला २२ लाख रुपयांची एकरकमी भरपाई देण्याचे आदेश कंपनीला दिले.

# मुंबईकरांवर आता कचरा शुल्क आकारणार ?

**मुंबई, दि. १८ : प्रतिनिधी**

मुंबईतील टोलेजंग इमारती, हॉटेल आणि कमर्शियल कारखान्यांतून निघणाऱ्या कचऱ्यांवर आता मुंबई महापालिका निर्मूलन कर आकारण्याच्या विचारात असून, सोमवारी झालेल्या सादरीकरणानुसार ही करवाढ लादली गेलीच तर केवळ निवासी घरांना तब्बल ६८७ कोटी रुपयांचा कचरा कर भरावा लागू शकतो.

महापालिकेचे प्रशासक भूषण गगराणी यांच्यासमोर सोमवारी सकाळी घनकचरा व्यवस्थापन विभागाने कचरा कर लागू करण्यासोबतच उघड्यावर धुंकणे, उघड्यावर कचरा करण्यावरील दंड वाढवण्याचा प्रस्ताव ठेवला. सध्या धुंकण्यावर फक्त २०० रुपये दंड आहे. तो ५०० रुपये करण्याचा प्रस्ताव सादरीकरणात ठेवला गेला. मात्र, सर्वांत मोठा विषय आहे तो कचरा कर लावण्याचा आणि त्यासाठी महापालिकेचे उपविधी अर्थात बायलॉज बदलावे लागणार आहेत. या बदलासाठीची कायदेशीर बाबी तपासण्याचे निर्देश गगराणी यांनी दिल्याचे कळते. मुंबई महापालिकेकडून ५०० फुटांपर्यंतच्या घरांना किमान १०० रुपये, तर त्यापेक्षा मोठ्या घरांना ५०० ते १००० रुपये कचरा निर्मूलन शुल्क आकारण्यात येणार आहे. व्यापारी गाळे आणि व्यापारी संकुलांवर हेच कचरा शुल्क किती आकारायचे हे अद्याप ठरलेले नाही. मात्र, निवासी भागापेक्षा ते नक्कीच जास्त असेल. अर्थात असे कोणतेही शुल्क लादताना मुंबईकरांच्या सूचना, हकरती विचारात घ्याव्या लागतील, अशी माहिती पालिका सूत्रांनी दिली. यापूर्वी २०१९- २० मध्ये तत्कालीन महापालिका आयुक्त अजोय मेहता आणि त्यानंतर २०२०- २१ मध्ये प्रवीणसिंह परदेशी यांनी प्रत्येक सोसायटीला कचरा शुल्क आकारण्यात येणार असल्याची घोषणा केली होती. मात्र तत्कालीन नगर सेवकांनी विरोध केल्याने सदर योजनेला स्थगिती मिळाली होती. आता प्रशासकीय राजवटीत या प्रस्तावाने पुन्हा उचल खाल्ली आहे.

अधिकारी सूत्रांनी पुढारीला सांगितले की, मुंबई महापालिका कायद्यानुसार, घनकचरा व्यवस्थापनाच्या सेवा मोफत देणे महानगरपालिकेला बंधनकारक आहे. म्हणूनच या सेवेवर कोणतेही शुल्क आतापर्यंत आकारता आलेले नाही. ते लादायचे असेल तर कायद्यात बदल करावा लागेल. सध्या पुणे, चेन्नई आणि दिल्लीत घनकचरा उचलण्यासाठी निवासी गाळ्यांना सरसकट १०० रुपये, तर व्यापारी गाळ्यांसाठी ५०० रुपये कचरा शुल्क आकारले जाते. ही ढाल आता मुंबईतही पुढे केली जात आहे. अर्थात माजी मंत्री आदित्य ठाकरे, खा. वर्षा गायकवाड, समाजवादी पार्टीचे आमदार रईस शेख आदी नेत्यांनी या हालचालींना विरोध चालवला असून, येऊ घातलेल्या महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही कचरा शुल्क आकारणी रोखली जाण्याची चिन्हे आहेत. अलीकडेच काँग्रेसमधून भाजपमध्ये गेलेले ज्येष्ठ नेते रवी राजा यांनीही या हालचालींना विरोध केला आहे. मुंबईकरांकडून महापालिका कचरा शुल्क आकारणार असल्याचे समजले असून लवकरच दोन-तीन दिवसांत मी आणि भाजपा नेते महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांची भेट घेऊन विरोध दर्शविणार आहोत, असे रवी राजा म्हणाले.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**वृक्ष प्राधिकरण**
**-जाहीर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (२४ जून २०२१ पर्यंत सुधारीत) कलम ८(३) (क) मधील तरतुदीनुसार परिमंडळ-४ मधील के/ पश्चिम विभागातील ०६ प्रस्ताव, पी/दक्षिण विभागातील ०२ प्रस्ताव व पी/उत्तर विभागातील ०२ प्रस्ताव असे एकूण १० प्रस्ताव मा. म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण / बी एम सी वृक्ष प्राधिकरण समिती यांच्या मंजूरीकरीता प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तावांमधील झाडे कापणे । पुनर्रोपित करणेबाबतचा तपशील हा म.न.पा. च्या www.mogm.gov.in या संकेतस्थळावर बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे > Notice 7 days- TA-WS-ZIV 76 या लिंकवर उपलब्ध आहे.

उपरोक्त प्रस्तावांविषयी आक्षेप वा सूचना असल्यास सदर जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात विहीत नमून्यात (Prescribed Format) उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात त्या सादर करव्यात. आपण आपल्या आक्षेप / सुचना विहीत नमून्यात (Prescribed Format) dysg.ta@mcgm.gov.in ह्या ई- मेलवरही नोंदवू शकता.

तसेच विहीत मुदतीत सादर न झालेल्या आक्षेपांचा / सुचनांचा विचार करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. लेखी ई-मेलद्वारे सुचना / आक्षेप पाठवूनही आपणास आवश्यक असल्यास सदर सुचना / आक्षेपांच्या लेखी/ ईमेलच्या प्रतीसह आपण व्यक्तीशः सुनावणीकरीता उपस्थित राहू शकता. सदर सुचना / आक्षेपाबाबतची सुनावणी दि. ०१/०१/२०२५ रोजी उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात दु. ४.३० ते ५.०० वाजेदरम्यान ठेवण्यात आली आहे.

**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी**
**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांचे कार्यालय**
**वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय,**
**२ रा मजला, हम्बोल्ट पेंग्विन कक्ष,**
**संत सावता माळी मार्ग,**
**भायखळा (पूर्व), मुंबई-४०००२७**
**दूरध्वनी क्र. २३७४२१६२**
**Email id-dysg.talimcgm.gov.in**

सही/-
उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी

पीआरओ/२००५/जाहि./२०२४-२५

# आदित्य ठाकरेंचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना पत्र मुंबईकरांसाठी केली मोठी मागणी

**मुंबई, दि. १८ : प्रतिनिधी**

वरळी विधानसभेचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून महत्त्वाची मागणी केली आहे. महाराष्ट्रातील कलेक्टर लँड फ्री होल्ड करण्याचा दर १ टक्का करण्याची मागणी आदित्य ठाकरे यांनी पत्राद्वारे केली आहे. याचा मुंबईकरांना फायदा होणार असल्याचे आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे. त्याआधी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यावेळी आदित्य ठाकरे हे देखील उपस्थित होते.

आदित्य ठाकरे यांनी हे पत्र त्याच्या एक्स सोशल मिडिया अकाऊंटवरुन शेअर केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांना पत्र लिहून महाराष्ट्रातील कलेक्टर लँड फ्री होल्ड करण्याचा दर १ टक्का करावा, ही विनंती केली होती. त्यावर आज पुन्हा एकदा विधिमंडळात विनंती केली. यामुळे लवकरच मुंबईकरांना न्याय आणि संधीचा लाभ घेता येईल, ही आशा बाळगतो, असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे.



"मुंबई शहर व महाराष्ट्रातील कलेक्टर लॅन्ड विविध कारणांसाठी गृहनिर्माण संस्थांना भाडेकरारावर रहिवासी वापरासाठी दिलेल्या आहेत. सदर कलेक्टर लॅन्ड फ्री होल्ड करण्यासाठी १५ टक्के इतका दर आकारण्यात येतो. हा दर १ टक्का करण्यात यावा, जेणेकरून अशा जमिनीवर असणाऱ्या गृहनिर्माण संस्थामधील सामान्य नागरीकांना त्याचा फायदा होईल तसेच गृहनिर्माण संस्थांच्या जागा फ्री होल्ड करून घेण्याचे प्रमाण वाढून सरकारी तिजोरीमध्ये हि भर पडेल. तरी महाराष्ट्रातील कलेक्टर लॅन्ड फ्री होल्ड करण्याचा दर १ टक्का करावा हि विनंती," असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं.

विधानसभा निवडणुकीत एकमेकांवर जोरदार टीका केल्यानंतर राजकीय पक्ष पुन्हा एकत्र दिसत आहेत. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आ उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानभवनात भेट घेतली. यावेळी उद्धव यांच्यासोबत आमदार आदित्य ठाकरे, वरुण सरदेसाई, अनिल परब उपस्थित होते. उद्धव ठाकरे हे सध्या विधान परिषदेचे सदस्य आहेत. या भेटीनंतर महाराष्ट्रातही राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला उपस्थित राहण्यासाठी उद्धव ठाकरे मंगळवारी नागपुरात पोहोचले. येथे पोहोचल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. दोघेही फडणवीस यांच्या दालनात भेटले. उद्धव ठाकरे यांच्या देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसंदर्भात आदित्य ठाकरे यांनी माहिती दिली. "आमच्या पक्षप्रमुखांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतली. आम्ही एक पाऊल पुढे टाकले आहे. दोघांनीही महाराष्ट्रासाठी काम करताना राजकीय शहाणपण दाखवले पाहिजे. महाराष्ट्राकडून अपेक्षा आहे की ते एकत्र येऊन काम करू," असं आदित्य ठाकरे म्हणाले.